# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## क्रिडा विभाग
## जाहिर सुचना

**विषय** :- ठाणे महानगरपालिकेच्यावतीने महिला खेळाडू दत्तक घेऊन व्यावसायिक संघ तयार करणे.

शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार क्रिडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने कबड्डी या खेळाचे व्यवसाययिक संघ तयार करणेकरीता नमुद खेळातील उदयोन्मुख खेळाडूंकडून खालीलप्रमाणे.

| अनु क्र. | खेळाचा प्रकार | खेळाडू संख्या | मासिक ठोक मानधन |
|---|---|---|---|
| 1. | कबड्डी | 12 | 15,000/- |

उक्तप्रमाणे नेमणूका निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर करारन्वये करण्यात येणार आहे. या बाबतची विस्तृत माहिती ठाणे महानगरपालिका संकेतस्थळावर www.thanecity.gov.in वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर अर्ज स्विकृत दि. 26/03/2018 पर्यंत आहे. संबंधित खेळाच्या खेळाडूंनी यांची नोंद घ्यावी.

(संदिप माळवी)
उप आयुक्त (क्रिडा विभाग)
**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

# ठाणे महानगरपालिका, ठाणे
## क्रिडा विभाग
### अर्जाचा नमुना
### ( महिला कबड्डी या खेळाच्या संघाकरीताच अर्ज)

प्रति,
मा. आयुक्त,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

1. संपूर्ण नाव : ………………………………………………………………………………………….
(प्रथम आडनाव)
2. पत्ता : ………………………………………………………………………………………….
………………………………………………………………………………………….
………………………………………………………………………………………….
………………………………………………………………………………………….
3. संपर्क क्रं. : …………………………… Email ID ……………………………………….

4. जन्म तारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

वय दि. 01/01/2018 रोजीचे वय

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

5. शैक्षणिक अर्हता :

| उत्तीर्ण परीक्षा | विद्यापीठ / मंडळाचे नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | विषय | टक्केवारी / श्रेणी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

6. नोकरी करीत असल्यास :

| संस्थेचे नाव व पत्ता | कार्यरत असलेल्या पदाचे नाव | कालावधीत | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

7. विद्यापीठ, जिल्हा, राज्य व राष्ट्रीस्तवर खेळातील काममगीरीबाबतची माहिती

| **स्पर्धा** | **दिनांक** | **स्थळ** | **आयोजक** | **स्थान / क्रमवारी** |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

8. अवगत असणाऱ्या भाषा :

| **भाषा** | **मराठी** | **हिंदी** | **इंग्रजी** |
|---|---|---|---|
| | | | |

9. प्रवर्ग :

| **खुला** | **अ.जा** | **अ.ज** | **इतर** |
|---|---|---|---|
| | | | |

10. आपणास विरूद्व न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इ. कारवाई चालू आहे काय ? नाही असल्यास थोडक्यात तपशील द्यावा.

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

..........................................................................................................................

11. अर्जासोबत खालील (छायाकिंत) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

1.
2.
3.
4.
5.

वर नमुद केलेली सर्व माहिती खरी असून ती खोटी आढल्यास माझी कोणत्याही टप्यावर नेमणुक रद्द करण्यात येईल आणि माझे विरूद्ध कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक : ( )

उमेदवाराचे नाव व सही

# **ठाणे महानगरपालिका, ठाणे**

## क्रिडा विभाग

## जाहिर सुचना

<u>ठाणे महानगरपालिकेच्या वतीने कबड्डी खेळाचे खेळाडु दत्तक घेऊन व्यावसायिक संघ तयार करणेकरीता महिला खेळाडुंकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.</u>

राज्यातील जास्तीत जास्त खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धामध्ये सहभागी होता यावे याकरीता राज्यातील क्रिडा विषयक बाबींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार ठाणे महानगरपालिका शहरातील उद्योन्मुख क्रिडापटूंना अधिकाअधिक प्रोत्साहन देण्याच्या हेतुने ठाणे महानगरपालिकेच्या वतीने कबड्डी या खेळाचे व्यसायिक संघ तयार करणेकामी नमुद खेळाच्या महिला खेळाडू पदाकरीता खालील अटी व शर्तीस अधिन राहून अर्ज मागविण्यात येत आहे.

1. कबड्डी या खेळाचे संघ दत्तक घेण्याच्या दृष्टीने संबधित खेळातील शिव छत्रपती पुरस्कार पात्र खेळाडू, तसेच जिल्हा व राज्य संघटनेचया माध्यमातुन कबड्डी-12 महिला खेळाडूंची निवड करण्यात येईल.

2. सदरहु खेळांडुची नावे निश्चित करताना यामध्ये राष्ट्रीय स्तरावर/ राज्य स्तरावर/ विद्यापीठ स्तरावर संघाचे प्रतिनिधीत्व केलेल्या महिला खेळाडुंना प्राध्यान देण्यात येईल.

3. खेळाडूंच्या नियुक्त्या शासनाने सुचित केल्याप्रमाणे विहित नियमानुसार कंत्राटी / करार पद्धतीने असतील. त्यांना सेवेत कायमस्वरूपी करण्यासाठी दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

4. निवड झालेल्या खेळाडूंना वेळोवेळी सरावास उपस्थित राहणे बंधनकारक राहील.

5. खेळाडूंची नियुक्ती करण्याकरीता गठित करण्यात आलेल्या समितीमार्फतच खेळाडूंची निवड करण्यात येईल.

6. सरावा दरम्यान अथवा स्पर्धेदरम्यान दुखापत झाल्यास त्यावरील उपचार महानगरपालिका रूग्णालयात मोफत करण्यात येईल.

7. खेळाडूंची  किमान पात्रता विचारात घेता खुल्या गटाचा राज्य अजिंक्यपद स्पर्धेतील प्राविण्यप्राप्त महिला खेळाडू तसेच एकविध संघटनाद्वारा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंची निवड करता येईल.

8. एखादा खेळाडू अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्याचा करार रद्द करता येईल. त्याकरीता दत्तक योजने अंतर्गत निवड झालेल्या खेळाडूंना रक्कम रू. 100 च्या स्टॅम पेपरवर बंधपत्र (करारनामा) द्यावे लागेल.

9. सदर व्यावसायिक संघांतील खेळाडूंना प्रतिमहा रक्कम रू. 15,000/- याप्रमाणे ठोक मासिक मानधन अदा करण्यात येईल.

10. करार / कंत्राटावर निवडण्यात आलेले खेळाडूंचा वार्षिक प्रगतीचा आढावा घेऊन पूढील करार वाढविण्याबाबत मा. आयुक्त यांचेकडे प्रस्तावित करण्यात येईल व याबाबतचे सर्वधिकार मा. आयुक्त यांना असतील.

11. खाजगी संस्थेत नोकरी करत असणाऱ्या तसेच शालेय / विद्यापीठात शिक्षण घेत असणाऱ्या व विहित नियमानुसार पात्र ठरणाऱ्या खेळाडूंस मासिक मानधनाऐवजी स्पर्धा कालावधी व स्पर्धेकरीतांचे प्रवास दिवसांकरीता प्रतिदिन रक्कम रू. 1,000/- प्रमाणे भत्ता देय असेल.

12. ठाणे महानगरपालिका संघ कोणत्याही स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर स्पर्धेत पारितोषिक रक्कम मिळाल्यास सदर मिळालेली  रक्कम स्पर्धेत सहभागी खेळाडू, प्रशिक्षक व व्यवस्थापक यांना 60% व 40% रक्कम ठाणे महानगरपालिकेच्या निधीत जमा करण्यात येईल. मात्र स्पर्धेतील स्मृतीचिन्ह ठाणे महानगरपालिका क्रिडा विभागात जमा करतील.

13. स्पर्धेत संघाच्या सहभागासाठी जर स्पर्धा आयोजक प्रवास अदा करणार नसतील तर अशा स्पर्धेत सहभागी ( जाणे-येणेकरीता) येणारा प्रवास खर्च तसेच प्रवासादरम्यान खर्च महापालिकेच्या वतीने करण्यात येईल.

14. निवड झालेल्या खेळाडू व मार्गदर्शक  यांना सराव व स्पर्धेदरम्यान क्रिडा गणवेश व इ. आवश्यक साहित्य आवश्येकतेनुसार मोफत उपलब्ध करून देण्यात येईल.

15. खेळाडूंना एकुण मासिक ठोक मानधना व्यतिरिक्त नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे इतर कोणतेही हक्क / अधिकार / लाभ मिळणार नाहीत.

16. उक्त नमुद नेमणुक मासिक ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात असेल. खेळाडू अपेक्षित कामगिरी करत नसल्यास त्यांचा करार समाप्त करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त यांचे राहतील.

17. उक्त अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांच्या कागदपत्राची छाननी करून पात्र उमेदवारांच्या मुलाखती अंतिम निवड यादी जाहिर करण्यात येईल.

उक्त प्रमाणे पात्रता धारण करणाऱ्या खेळाडूंनी 26 मार्च, 2018, सांय. 5.00 वार्जपर्यंत आपल्या खेळाबाबतच्या प्राविण्य प्रमाणपत्राच्या प्रमाणित छायाकिंत प्रतीसह खालील पत्यावर अर्ज सादर करावेत. अर्ज करताना लिफाफ्यावर खेळाडूंची आपण कबड्डी ज्या खेळाच्या संघात खेळाडू म्हणुन अर्ज केलेला आहे त्या खेळांचे नाव मोठया व ठळक अक्षरात नमुद करावे.

अर्ज करण्याचा कार्यालयाचा पत्ता:

क्रिडा अधिकारी,
दादोजी क्रिडा प्रेक्षागृह,
जवाहर बाग फायर ब्रिगेड रोड,
महागिरी, ठाणे (प).
फोन नं. : 022 – 25364061

(संदीप माळवी)
उप आयुक्त (क्रिडा विभाग)
ठाणे महानगरपालिका,ठाणे.